# तळ्याकाठी

अशा एखाद्या तळ्याच्या काठी बसून रहावे मला वाटते
जिथे शांतता स्वतःच निवारा शोधीत थकून आली असते
जळाआतला हिरवा गाळ निळ्याशी मिळून असतो काही
गळून पडत असता पान मुळी सळसळ करीत नाही
सावल्यांना भरवीत कापरे जळवलये उठवून देत
उगीच उसळी मारून मासळी मधूनच वर नसते येत
पंख वाळवीत बदकांचा थवा वाळूत विसावा घेत असतो
दूर कोपऱ्यात एक बगळा ध्यानभंग होऊ देत नसतो
हृदयावरची विचाराची धूळ हळूहळू जिथे निवळत जाते
अशा एखाद्या तळ्याच्या काठी बसून रहावे मला वाटते

अनिल

(सांगाती)

स्थिरचित्तता किंवा निःशब्द शान्तता या शब्दांतून tranquility ही भावना पुरेशी व्यक्त होऊ शकत नाही पण या कवितेतील तळ्याकाठी अगदी tranquil वातावरण असणार हे नक्की.

शान्तताच जर निवारा शोधीत येऊन या ठिकाणी विसावली असेल तर त्याचे वर्णन माझ्यासारख्याला शब्दात करता येणेच अशक्य आहे. ही कल्पना अगदी ज्ञानेश्वरीतील काही कल्पनांसारखी वाटते.

परवा एका जुन्या मित्राची आठवण झाली म्हणून पटकन तयाचा मोबाइल नंबर फिरवला. फोन उचलून तो म्हणाला,"काही महत्वाचे काम आहे काय? तसे नसल्यास उद्या बोलू. आज मी आमच्या गावाला माझ्या लहानपणीच्या घरी केवळ आराम करायला आलो आहे. आज अगदी कोणाशीही बोलायची मला इच्छा नाहीये."
मग नंतर बोलताना असे जाणवले की तो थोडासा विमनस्क मनःस्थितीत होता. व्यवसायातील काही आडाखे चुकले होते. देणेदारांचे तगादे चुकवतांना तो जेरीस आला होता. तात्पुरती पिछेहाट होते आहे याचं त्याला फार दुःख नव्हतं पण परत भरारी घेण्यापूर्वी थोडी उसंत घ्यावी यासाठी त्याने अगदी एकान्तात, शहराच्या कोलाहलापासून दूर असे आपले गाव आणि अगदी जुने वडिलोपार्जित घर निवडले होते.

आजच्या कवितेतले तळे हे असेच आहे.
तिथे जाग आहे पण कोलाहल नाही. बदके शान्तपणे विसावली आहेत, बगळा बकध्यान लावून निवान्त उभा आहे, पाने गळताहेत पण त्यांचा आवाजही नाही. त्या झाडाला पालवी फुटेल तीही अशीच निमूटपणे.

या शान्ततेत विचारांची धूळ हळूहळू निवळत जाते हा निसर्गक्रमच वाटतो मग.

ही धूळ वाऱ्याने उडून जात नाही, पुरात वाहून जात नाही, उन्हात सुकून जात नाही तर ती हळूहळू निवळत जाते.

आपल्या सगळयांनाच असं तळं कधीतरी शोधावंसं वाटतं आणि त्या तळयाकाठी जाऊन बसावंसंसुद्धा वाटतंच. मनात विचारांचा

गोंधळ झाला, काहीही कारणाने उद्विग्नता वाटली किंवा कुठल्यातरी काळजीने जिवाला घोर लागला की अशा तळयाची जास्त गरज भासते.
आनन्दाच्या काळी मात्र हे तळं आपल्या खिजगणतीतही नसतं.

ज्या लोकांना अशा तळयाची गरजच भासत नाही त्यांचा मला फार हेवा वाटतो.

अनेक वेळा हे तळं मला माझ्या काही निवडक सुहृदांच्या सोबतीत मिळतं, पुस्तकांच्या सोबतीत मिळतं आणि स्वतःशी कविता गुणगुणतांना किंवा छानसं संगीत ऐकतांनाही सापडतं.

ही विचाराची धूळ निवळली म्हणजे मन स्थिरचित्त होतं. त्या वेळच्या मनाची अवस्था. ज्ञानेश्वरीतील एक दृष्टान्त आहे.

नातरी कर्दळीचा गाभा। बुंधी सांडोनि उभा।
का अवयावचि नभा। निवडला तो।।

कर्दळीचा बुंधा उभा असलेला दिसतो आणि त्या बुंध्याच्या रूपाने ते झाड आपल्याला दिसत रहाते. हा बुंधा एकावर एक असलेल्या सोलपटांचा बनलेला असतो. हे एक एक सोलपट काढत गेले आणि अखेरचे सोलपटही गळून पडले की त्या कर्दळीच्या झाडाचं स्वरूप आणि अस्तित्व कसं राहील?

विचारांची धूळ निवळल्यावर आपल्या मनाची अवस्था ही अशीच होत असावी असं मला वाटतं.

**मन्दार**